// प्रेस नोट //

दिनांक १८/१२/२०१८

**त्रिंबक सिताराम पवळ, वय ५७ वर्षे,धंदा नोकरी,वनरक्षक,वनपरिक्षेत्र कार्यालय, आष्टी वर्ग-३,रा.चुंबळी ता.पाटोदा जिल्हा बीड, यांना १,५००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.१४/१२/२०१८ रोजी तक्रारदार यांनी अेसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे लाकुड वाहतुकीचे ट्रक्टर चालु देण्यासाठी श्री.पवळ, वनरक्षक आष्टी हे तक्रारदार यांना १,५००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.१४/१२/२०१८ रोजी आष्टी येथे लाच मागणी बाबत खात्री केली असता श्री.पवळ वनरक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी १,५००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक १८/१२/२०१८ रोजी लोकसेवक पवळ, वनरक्षक आष्टी यांचे विरुध्द बस स्टँड,आष्टी परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता बस स्टँड,आष्टीचे आऊट गेटचे समोर रोडवर लोकसेवक पवळ यांना तक्रारदार यांचेकडून १,५००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असून **लोकसेवक त्रिंबक सिताराम पवळ, वय ५७ वर्षे,धंदा नोकरी, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय, आष्टी वर्ग-३,रा.चुंबळी ता.पाटोदा जिल्हा बीड** यांचेविरुध्द पोस्टे आष्टी येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा-१९८८ (सुधारणा अधिनियम-२०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक अेसीबी औरंगाबाद, मा.श्री.एस.आर.जिरगे,अपर पोलीस अधीक्षक, अेसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील व टीम एसीबी बीड यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२४४२/२२२६४९ |
| मेल आयडी | :- | dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- | www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

(गजानन वाघ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

Scanned by CamScanner